महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, कराड
## प्रकल्पग्रस्तांकरिता जाहिरात क्र. ४/२०१७

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या मुख्य अभियंता, अ.उ.दा. प्रकल्प नि संवसु परिमंडल, कराड या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील विभागीय कार्यालयांसाठी खाली नमुद केल्याप्रमाणे **वेतनगट- ४** मधील विभागीय सेवाज्येष्ठतेची तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम तंत्रज्ञ श्रेणी-४) ची रिक्त पदे प्रकल्पग्रस्त उमेदवारांमधून सरळसेवा भरतीद्वारे भरणे करीता **केवळ अर्हतापात्र प्रकल्पग्रस्त उमेदवारांकडून** विहित नमुन्यातील अर्ज **ऑनलाईन** पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

| क्र. | पदाचे नाव | मागास प्रवर्ग | | | खुला | एकुण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु. जाती | अनु. जमाती | इतर मागासवर्ग | | |
| १ | तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम तंत्रज्ञ श्रेणी-४) | ३ | २ | ३ | ५ | १३ |

**टिप :-**

**१)** जाहिरातीत दर्शविण्यात आलेली जाती प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होवू शकते. तसेच आरक्षणात बदल होवू शकतो. प्रशासनाच्या निकडीनुसार असा बदल करण्याचे अधिकार कंपनी राखून ठेवत आहे.

**२) वेतनश्रेणी:-** रूपये १००५०-१९५-११०२५-२३५-१३३७५-२७५-१९७००

** मूळ वेतना व्यतिरिक्त महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वैद्यकीय भत्ता, वगैरे कंपनीच्या नियमाप्रमाणे लागू राहतील.

**३) शैक्षणिक अर्हता (दि. ३१.१२.२०१७ पर्यंतची):-**

**शैक्षणिक अर्हता**

शिकाऊ उमेदवारी कायदा-१९६१ अंतर्गत राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले वीजतंत्री या व्यवसायातील राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र धारक.

**किंवा**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून वीजतंत्री व्यवसायातील पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले वीजतंत्री या व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र धारक.

**किंवा**

Candidate who has completed a course of 2 years duration under the scheme of **Centre of Excellence (Electrical Sector) awarded by the NCTVT, New Delhi as per following details & Period:-**

| | | |
|---|---|---|
| Basic Courses | 1 Year | Broad Based Basic Training Course in Electrical Sector (BBBT). |
| Advance Course / Module | 6 months | Training in Advanced modules for next six months in following modules after BBBT. **"Operation & Maintenance of Equipment used in HT, LT, Substation & cable jointing".** |
| Apprenticeship Training | 6 months | 6 months apprenticeship in the trade of Mechanic (HT, LT Equipment's and Cable Jointing) Under Apprenticeship Act -1961 awarded by NCTVT, New Delhi. |
| The candidate should have completed & cleared each above courses / training / apprenticeship for which he should possess mark sheets & training / passing certificates awarded by NCTVT, New Delhi. | | |

**४) वयोमर्यादा:-** दि. ३१.१२.२०१७ रोजी उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ४५ वर्षे पुर्ण असावे.
(प्रकल्पग्रस्तांसाठी जाहिरात असल्यामुळे)

वयोमर्यादेकरीता माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ(एस.एस.सी.) / शाळा सोडल्याचा दाखला यांचे कडील प्रमाणपत्रावर नोंदविलेली / दर्शविलेली जन्मतारीख ग्राहय धरण्यात येईल. सदर प्रमाणपत्र ऑनलाईन अर्जाबरोबरच स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक राहील.

**टीप:** तदर्थ म.रा.वि.मंडळ/महापारेषण कंपनीत यशस्वीरित्या **'वीजतंत्री'** या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उमेदवारांकरीता त्यांच्या प्रशिक्षण कालावधी इतकी कमाल वयोमर्यादा शिथीलक्षम राहील.

५) **आरक्षण:**

**१. सामाजिक आरक्षण (मागास प्रवर्ग):-**

अ) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९.०१.२००४ पासून अंमलात आणला आहे. सदर अधिनियमांनुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागास प्रवर्गातील म्हणजे विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांना उन्नत/ प्रगत गटाचे (क्रिमिलिअर) तत्व लागू केले आहे. त्यामुळे या प्रवर्गातील उमेदवाराने उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले सन २०१७-१८ या वर्षा करीता वैध असलेले नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र उमेदवाराजवळ असणे आवश्यक आहे. उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास त्याने ते ऑनलाईन अर्जाबरोबरच स्कॅन करुन अपलोड करावे. जर तसे सन २०१७-१८ साठीचे वैध असलेले प्रमाणपत्र उमेदवाराजवळ उपलब्ध नसेल तर त्याने ते काढून ठेवावे व त्याची निवड झाल्यास त्याने ते प्रमाणपत्र त्याच्या कागदपत्र पडताळणीच्यावेळी संबंधीत कार्यालयात सादर करावे. तथापि, सन २०१६-१७ या वर्षासाठीचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.

ब) मागास प्रवर्गातील उमेदवारांना जातीचा दाखला ऑनलाईन अर्जाबरोबरच स्कॅन करुन अपलोड करणे बंधनकारक राहील. तथापि, ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्याची नियुक्ती महाराष्ट्र शासन निर्णय क्र. **बीसीसी-२००९ / प्र.क्र.२९१ /०९/१६-ब दि. ०५.११.२००९ सह वाचावे शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११ / प्र.क्र.१०६४/२०११/१६ब दि.** १२.१२.२०११ च्या तरतुदी नुसार करण्यात येईल.

**२. समांतर आरक्षण:**

**अ) प्रकल्पग्रस्त :–**

शासन निर्णय क्र. न्यायप्र -१००९ / प्र.क्र. २००२/०९/१६-अ, दिनांक २७.१०.२००९(सह वाचावे शासन निर्णय क्र. भुकंप-१००९ / प्र.क्र. २०७/२००९/१६-अ, दिनांक २७.०८.२००९) मधील तरतूदीनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्तीना ५ टक्के असलेल्या आरक्षणांतर्गत येणा-या पदांसाठीच हि जाहिरात आहे. त्यामुळे अर्ज करणा-या प्रकल्पग्रस्त उमेदवारांने संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे नाव नोंदविले असले पाहिजे. तसेच सदर उमेदवाराकडे संबंधीत जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी जारी झालेले **प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अर्ज करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत धारण केलेले असले पाहीजे. सदर प्रमाणपत्र ऑनलाईन अर्जाबरोबरच स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक राहील.**

**ब)** जाहिरातीमध्ये अपंग प्रवर्गासाठी पदे राखीव नाहीत. तथापि, जे पात्र प्रकल्पग्रस्त अपंग उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसतील त्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक पुरविण्यात येईल. मात्र या बाबत त्यांनी सोबत जोडलेला declaration form ऑनलाईन अर्ज करताना अपलोड करावा. लेखनिक पुरविणेबाबत कंपनीचा निर्णय अंतिम राहील.

६) अ) एकदा अर्जात दर्शविलेल्या जाती संबंधीचा विकल्प / बदलता येणार नाही.

ब) मागासवर्गीय उमेदवारांची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्यांची निवड ही खुल्या प्रवर्गात झाल्याचे समजण्यात येईल.

क) निवड झालेले पात्र प्रकल्पग्रस्त उमेदवार हे त्या त्या पदाच्या अनुशेष निहाय आरक्षणाखाली उदा. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासप्रवर्ग अथवा खुल्या प्रवर्गातील राखीव जागांवर दर्शविण्यात येईल.

ड) समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही- १०१२ / प्र.क्र. १६ /१२ /१६-अ दि. १३.०८.२०१४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

इ) खुल्या प्रवर्गातून अर्ज सादर करणाऱ्या मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारास खुल्या प्रवर्गासाठीच ग्राह्य धरण्यात येईल.

## ७) <u>परिक्षा शुल्क:-</u>

१) उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यापूर्वी व परीक्षा शुल्काची रक्कम भरण्यापूर्वी आपण प्रकल्पग्रस्त उमेदवार आहोत व सदर पदासाठी पात्र आहोत याची खात्री करावी व नंतरच अर्ज व परीक्षा शुल्क भरावे.

२) उमेदवारांना खाली दर्शविल्याप्रमाणे परिक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने (डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड / इंटरनेट बँकिंग इ. व्दारे) भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३) ऑनलाईन शुल्क भरण्याव्यतीरिक्त अन्य कोणत्याही पध्दतीचे शुल्क स्विकारले जाणार नाही.

४) विहीत शुल्कापेक्षा कमी शुल्क भरल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

५) सदर परिक्षा शुल्क हे **"ना परतावा"** राहील व कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

६) परिक्षा शुल्काची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| **खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी** | **मागासवर्गीय उमेदवारांसाठी** |
|---|---|
| रु. ५००/- | रु. २५०/- |

**<u>टिप:-</u>** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरताना उमेदवारास वर दर्शविलेल्या शुल्का बरोबरच बँकेच्या नियमाप्रमाणे बँक चार्जस भरावे लागतील (परिक्षा शुल्क + बँक चार्जेस).

## ८) <u>परिक्षा केंद्र :-</u>

ऑनलाईन परिक्षेकरीता निश्चित केलेली परिक्षा केंद्र खालील प्रमाणे असतील.

***मुंबई, नागपूर, नाशिक, कोल्हापूर***

उमेदवारास तीन परिक्षा केंद्रांचा पर्याय त्याच्या सोईकरता /अग्रक्रमाने उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने उमेदवाराने प्राधान्यक्रमाने तीन परिक्षा केंद्रांची नावे ऑनलाईन अर्जात नमूद करावी.

- उमेदवाराने नमूद केलेल्या तीन केंद्रांपैकी एक केंद्र परिक्षेसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि, त्या केंद्रास आवश्यक असलेल्या उमेदवारांची नोंदणी न झाल्यास त्या केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार नाही. त्यामुळे सदर उमेदवारांना उपलब्धतेनुसार अन्य परिक्षा केंद्रावर वर्ग करण्यात येईल.
- उमेदवाराने निवड केलेल्या केंद्रांवर त्या केंद्राच्या क्षमतेपेक्षा जास्त उमेदवारांची नोंदणी झाल्यास उमेदवारास अन्य उपलब्ध केंद्रावर वर्ग करण्यात येईल.
- उमेदवारास परीक्षेसाठी कोणते केंद्र ठेवावे याबाबतचा तसेच कोणतेही केंद्र बदलण्याचा, वाढविण्याचा अथवा कमी करण्याचा कंपनीचा निर्णय अंतिम राहील.
- ऑनलाईन परीक्षेसाठीच्या प्रवेश पत्रावर परिक्षा केंद्राचा संपुर्ण तपशील देण्यात येईल.
- उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेस स्वतःच्या जोखीमवर उपस्थित रहावे. महापारेषण कंपनी कोणत्याही प्रकारच्या दुखापतीस अथवा हानीस जबाबदार राहणार नाही.

## ९) <u>ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत:-</u>

१) फक्त ऑनलाईन पध्दतीने कंपनीच्या संकेतस्थळावर भरलेले अर्ज स्विकारले व विचारात घेतले जातील.

२) ऑनलाईन अर्ज सादर करण्यासंबंधीची कार्यपध्दत Application Process Flow या सदराखाली देण्यात आलेली आहे. उमेदवाराने Application Process Flow वर Click करुन त्याबाबत अधिक माहिती जाणुन घ्यावी जेणेकरुन ऑनलाईन अर्ज भरणे सोईचे व सुलभ होईल.

३) पात्रता धारक उमेदवाराने जाहिरातीच्या शेवटी देण्यात आलेल्या लिंकवर क्लिक करुन ऑनलाईन अर्ज व प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर करावयाचे आहे. इतर माध्यमाने अर्ज व प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्यास विचारात घेतले जाणार नाही.

४) ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणीक अर्हता, वय, प्रमाणपत्र वगैरे बाबी तसेच अटी, शर्ती व इतर बाबी काळजीपूर्वक वाचाव्यात व जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे आपण प्रकल्पग्रस्त म्हणून सदर पदासाठी पात्र आहोत का याची खात्री करावी.

५) उमेदवारांनी ऑनलाईन सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात प्रवर्ग, प्रकल्पग्रस्त, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनीकडे शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेली असणे, महाराष्ट्र राज्य अधिवास प्रमाणपत्र, इत्यादी बाबी सिध्द करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिध्द करु न शकल्यास त्याची निवड जरी झाली तरी ती रद्द करण्यात येईल.

६) **ऑनलाईन पध्दतीने परिक्षा शुल्क भरण्यापुर्वी उमेदवारांनी** आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रती व त्याच्या **Scan Copy** तसेच, ऑनलाईन पध्दतीने परिक्षा शुल्क भरण्यासाठी आवश्यक माहिती /साहित्य जवळ ठेवावे.

७) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करण्यासाठी **"New Registration"** यावर Click करुन अर्ज भरावा.

८) ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराने प्रथम ज्या परिमंडलात अर्ज करावयाचा आहे त्याचे नाव काळजीपूर्वक निवडावे व तदनंतर पूढील अर्ज भरावा.

९) परिमंडलाचे नाव निवडल्यानंतर उमेवाराने जात प्रवर्ग, आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे किंवा कसे, महाराष्ट्र राज्य अधिवास प्रमाणपत्र / उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, परिक्षा केंद्रांचा प्राधान्यक्रम, नाव, जन्मतारीख, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक याची माहिती काळजीपूर्वक भरुन Submit Option वर Click करुन रजिस्ट्रेशन करावे.

१०) रजिस्ट्रेशन करताना उमेदवाराने नोंदविलेल्या ईमेल पत्ता (Email Address) व भ्रमणध्वणी क्रमांकावर पुढील प्रक्रियेकरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड देण्यात येईल. उमेदवाराने सदर रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड याची नोंद आपल्याकडे काळजीपुर्वक करुन ठेवावी. रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डचा ई-मेल उमेदवारास Inbox मध्ये प्राप्त न झाल्यास तो Spam मध्ये जाण्याची शक्यता असल्याने उमेदवाराने तो Spam Folder मध्ये तपासावा.

११) भरती प्रक्रियेबाबतच्या पुढील सुचना उमेदवाराने ऑनलाईन अर्जात दिलेल्या ईमेल पत्त्यावर (Email Address) व भ्रमणध्वणी क्रमांकावर देण्यात येणार असल्याने उमेदवाराने आपला भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल ही भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वापरात ठेवण्याची खबरदारी घ्यावी. उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल भरती प्रक्रिया पुर्ण होण्या अगोदर बंद झाल्यास व त्यास ईमेल / संदेश प्राप्त न झाल्यास व त्यामुळे तो / ती परिक्षेस बसू शकला/शकली नाही अथवा निवड झाल्यावर रुजू होवू शकला/शकली नाही तर त्यास कंपनी जबाबदार रहाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२) एकदा रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड प्राप्त झाल्यानंतर उमेदवारास पूढील माहिती काही कारणास्तव नंतर भरावायाची असल्यास अथवा ऑनलाईन परिक्षा शुल्क नंतर भरावयाचे असल्यास अथवा कागदपत्रे /प्रमाणपत्रे अपलोड करावयाचे असल्यास त्याला देण्यात आलेला रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड व्दारे तो नंतर Login करुन माहिती भरु शकतो / परिक्षा शुल्क भरु शकातो /कागदपत्रे /प्रमाणपत्रे अपलोड करु शकतो. मात्र सदर माहिती, शुल्क व कागदपत्रे /प्रमाणपत्रे अपलोड त्यास ऑनलाईन अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत भरावी लागेल. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत भरता येणार नाही.

१३) ऑनलाईन अर्ज भरत असताना काही अडचणी आल्यास त्या संबंधीची अडचण **recruitment_helpdesk@mahatransco.in** या ई-मेल पत्त्यावर नोंदवावी /पाठवावी. तांत्रिक अडचणींकरता **022-42040240 / 022-42040188/ 022-26595228** या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१४) **उमेदवाराचे छायाचित्र, स्वाक्षरी व आवश्यक प्रमाणपत्रे स्कॅन करुन अर्जामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करणे बंधनकारक आहे. त्यासाठी उमेदवाराने खालील सूचनांचे पालन करावे:**

**अ) फोटो /छायाचित्र स्कॅन:-**

स्वत:चा अलिकडच्या काळातील छायाचित्र/फोटो (रुंदी ३.५ से.मी. x उंची ४.५ से.मी.) स्कॅन करुन अपलोड करावी. याकरिता एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित (Attested) करु नये. वरील सूचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त फोटो स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल. फोटोची संपूर्ण इमेज स्कॅन करुन jpg/jpeg फॉर्मेटमध्ये संगणकावर स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. फोटोची संपूर्ण इमेज ५० Kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dip resolution, no.of colours, etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे. या सर्व बाबींची दक्षता उमेदवाराने काळजीपूर्वक घ्यावी. अन्यथा उमेदवारास ऑनलाईन परिक्षेसाठी प्रवेश देताना अडचणी येतात व काही वेळा ओळख पटत नसल्याने प्रवेश नाकारला जातो.

ब) **स्वाक्षरी स्कॅन**

स्वत:ची अलिकडच्या काळातील स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावी. याकरिता एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकारामध्ये काळ्या शाईच्या पेनने चौकोनात स्वाक्षरी करावी. फक्त स्वाक्षरी स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल. स्वाक्षरीची संपूर्ण इमेज स्कॅन करुन jpg/jpeg फॉर्मेटमध्ये संगणकावर

स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. स्वाक्षरीची संपूर्ण इमेज २० Kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dip resolution, no.of colours, etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे.

क) **कागदपत्रे / प्रमाणपत्रे:**

उमेदवाराने अर्जात नमूद केलेली अर्हतेसंबंधिची आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे जसे की, शिक्षण, वय, जात, जात वैधता, प्रकल्पग्रस्त, महाराष्ट्र अधिवास, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे (**Non Creamy Layer**), तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनीने जारी केलेले शिकाऊ उमेदवारी पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र, इ. इमेज स्कॅन करुन **jpg/jpeg** फॉर्मेटमध्ये संगणकावर वेगवेगळ्या फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. प्रत्येक इमेजची **Size** ५०० Kb पेक्षा जास्त नसावी. इमेजची **Size** ५०० Kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dip resolution, no.of colours, etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे.

ड) अधिक माहितीसाठी उमेदवारांनी जाहिरातीसोबत जोडलेले परिशिष्ठ (Annexure) पहावे.

- **प्रत्येक उमेदवाराने वरिल प्रमाणे फोटो, स्वाक्षरी (सही) व त्यास लागू असलेली प्रमाणपत्रे त्या त्या ठिकाणी अपलोड करणे अनिवार्य आहे. तसेच उमेदवाराने फोटो, स्वाक्षरी (सही) व प्रमाणपत्रे स्कॅन करताना ती स्वच्छ व वाचतायेण्याजोगी असल्याची खात्री करुन घ्यावी. अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.**
- **ऑनलाईन परिक्षेनंतर उमेदवारांची पात्रता व निवड ही त्यांनी अपलोड केलेल्या प्रमाणपत्रांवर निश्चित करण्यात येणार असल्याने संबंधित उमेदवारास लागू असलेली सर्व प्रमाणपत्रे त्याने /तिने अपलोड करावीत. अर्हता निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे अपलोड न करणाऱ्या किंवा त्या ठिकाणी इतर कागदपत्रे अपलोड केल्यास अशा उमेदवारांचा निवडसूची तयार करतांना विचार केला जाणार नाही / त्यांना अपात्र ठरविण्यात येईल याची उमेदवारांनी अर्ज सादर करतांनाच गांभिर्याने नोंद घ्यावी. याबाबत कंपनीचा निर्णय अंतिम राहील व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.**
- **सुस्पष्ट स्कॅन नसलेली कागदपत्रे / स्वाक्षरी अथवा फोटो अपलोड न केलेले / कोणत्याही प्रकारे अपूर्ण असलेला अर्ज भरती प्रक्रिये करीता विचारात घेतला जाणार नाही.**

१५) अर्जात नमुद केलेली माहिती उमेदवारास ऑनलाईन पध्दतीने इंग्रजी भाषेतून भरावी लागेल. पूर्ण माहिती भरल्यानंतर भरलेली माहिती बरोबर आहे का याची उमेदवाराने खात्री करावी. उमेदवारास ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीत Submit Option वर क्लिक करण्यापूर्वी बदल करावयाचा असल्यास अर्जदार Modify बटनावर क्लिक करुन अर्जात आवश्यक बदल करु शकतो.

१६) त्यानंतर संगणकावरील Submit Option क्लिक केल्यानंतर आपला अर्ज स्विकारला जाईल.

१७) उमेदवाराने संगणकावर Submit Option क्लिक करण्यापूर्वी ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करुन घ्यावी कारण Submit Option क्लिक केल्यानंतर अर्जात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१८) उमेदवार जो पर्यंत संगणकावरील Submit Option क्लिक करुन अर्ज सादर करत नाही तोपर्यंत उमेदवाराचा अर्ज स्विकारला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारास रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड देण्यात आला असला तरी उमेदवाराचा अर्ज स्विकारला गेला असे होणार नाही. याबाबत उमेदवारांनी व्यक्तीशः खात्री करावी.

१९) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर त्याची एक प्रत (Printout) काढून माहितीस्तव स्वत:जवळ जतन करुन ठेवावी. ऑनलाईन अर्जाची प्रत अथवा इतर कोणतीही कागदपत्रे या कार्यालयास पाठवण्याची आवश्यकता नाही.

२०) उमेदवारांने एकापेक्षा जास्त वेळेस अर्ज सादर केला असल्यास अशा उमेदवाराचा शेवटचा अर्ज व त्यामधील माहिती ग्राहय धरण्यात येऊन अगोदरचा अर्ज व त्यामधील माहिती रद्दबातल ठरविण्यात येतील.

२१) **सदर पदाकरीता देण्यात आलेली जाहिरात ही महापारेषण कंपनीच्या अन्य परिमंडलांकडून देखील निर्गमित केली आहे. सर्व परिमंडलांच्या जाहिरातींच्या अनुषंगाने लेखी परिक्षा एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. त्यामुळे अर्जदाराने जरी एका परिमंडलापेक्षा जास्त परिमंडलाच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केला असला तरी अर्जदार ज्या परिमंडल कार्यालयाच्या नोंदणी क्रमांकानुसार / परीक्षा क्रमांकानुसार लेखी परिक्षेस हजर राहील त्याच परिमंडलासाठी त्याचा अर्ज ग्राह्य धरला जाईल.**

२२) ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाची वाट न पाहता उमेदवाराने आपला अर्ज शक्यतो वेळेआधीच भरावा जेणेकरुन इंटरनेट बंद पडणे किंवा इतर समस्यांमुळे अर्ज भरण्यास येणाऱ्या अडचणी उद्भवणार नाही.

२३) ऑनलाईन परीक्षेसंबंधीची माहिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्यानंतर उमेदवाराला त्याचे ऑनलाईन परीक्षेचे पत्र हे कंपनीच्या संकेतस्थळावरुन त्याच्या रजिस्ट्रेशन नंबरची व पासवर्डची नोंद करुन डाऊनलोड करता येईल/ प्रिंट काढता येईल. ऑनलाईन परीक्षेचे पत्र उमेदवारास कंपनीच्या संकेतस्थळावरुनच डाऊनलोड करावे लागेल / प्रिंट काढावी लागेल. ऑनलाईन परीक्षेचे पत्र (Call letter) पत्र पोस्टाने / कुरीअर मार्फत पाठविले जाणार नाही. प्रत्येक उमेदवारास ऑनलाईन परिक्षेस हजर राहताना ऑनलाईन परीक्षेचे पत्र (Call letter) सादर करणे अनिवार्य राहिल. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

**१०) ऑनलाईन परीक्षेस हजर राहण्यासंबंधिच्या सूचनाः-**

ऑनलाईन परीक्षेस हजर होताना उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहिल अन्यथा उमेदवारास परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१) लेखी परीक्षेस उपस्थित राहण्याबाबत महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध call letter.

२) खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रांपैकी कोणत्याही एका ओळखपत्राची **मूळ (Original)** व एक फोटोकॉपी सादर करावी. **ओळखपत्राची मूळ प्रत आवश्यक राहील रंगीत प्रत Colour Copy ग्राह्य धरली जाणार नाही.**

'पॅन कार्ड (PAN Card) / पासपोर्ट (Passport) /वाहन परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter's Card) / अलीकडचे छायाचित्र असलेले बँकेचे पासबूक (Bank Passbook with photograph) / राजपत्रित अधिकाऱ्याने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / लोकप्रतिनिधिने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / मान्यताप्राप्त महाविद्यालय / विद्यापिठाकडील अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र (valid recent Identity Card issued by a recognized college / university) / छायाचित्र असलेले आधार कार्ड (Aadhar card with a photograph) / कर्मचारी ओळखपत्र (Employee ID) / अलीकडचे छायाचित्र असलेले बार कॉंसीलचे ओळखपत्र (Bar Council Identity card with photograph)'

**३) महिला उमेदवारांसाठीः-**

महिला प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना जी माहिती भरली आहे त्या माहितीच्या आधारेच त्यांचे ऑनलाईन परिक्षेचे पत्र तयार होईल. महिला उमेदवारांचे परिक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव व छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव हे एकसमान असणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांचे परिक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव हे छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव पेक्षा वेगळे असेल अशा महिला उमेदवारांना परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

४) ऑनलाईन परिक्षेसाठी विहीत केलेल्या वेळेनंतर कोणत्याही कारणास्तव उशिराने हजर होणाऱ्या उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

५) परिक्षा केंद्रावर भरती प्रक्रियेसंबंधीच्या विविध औपचारिकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने अर्जदाराने परीक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेल्या वेळेच्या आधीच परिक्षाकेंद्रावर हजर राहणे अपेक्षीत आहे.

**६) ओळखपत्र तपासणीः-**

परीक्षा केद्रांवर /परिक्षा सभागृहात उमेदवारांच्या परीक्षा पत्राची (Call letter), मूळ छायाचित्र ओळखपत्राची तपासणी करण्यात येईल. उमेदवार स्वतःची ओळख सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यास अशा उमेदवारास परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**११) निवड पध्दतीः**

१. सदर पदाकरता लेखी परीक्षा ही ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येईल व या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड केली जाईल.

२. अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची वस्तूनिष्ठ स्वरुपाची (Objective Type) ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा ही पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणीक अर्हता (Educational Qualification), सामान्य अभियोग्यता चाचणी (General Apptitude) व मराठी भाषेचे ज्ञान (Marathi Language)यावर आधारित राहील.

३. उमेदवाराने दिलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांना शास्ती /दंड (Penalty) असेल त्यानुसार त्या प्रश्नास विहित असलेल्या एकुण गुणांच्या १/४ (०.२५%) इतके गुण दंड म्हणून प्राप्त गुणांमधून वजा करण्यात येऊन त्यानंतर अंतिम गुण काढण्यात येतील. तथापि, उमेदवाराने एखादया प्रश्नाचे उत्तर न दिल्यास / रिक्त ठेवल्यास अशा प्रश्नांना शास्ती /दंड (Penalty) लागणार नाही.

४. ऑनलाईन / लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल, त्यासाठी मुलाखती घेण्यात येणार नाहीत. तथापि, भरती प्रक्रिया व निवड करण्याची पध्दत व परिक्षा कधी व कुठे घ्यायची याबाबत कंपनीचा निर्णय अंतिम असेल.

५. तदर्थ म.रा.वि.मंडळ/महापारेषण कंपनीत यशस्वीरित्या 'वीजतंत्री' या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केलेल्या सर्व अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना त्यांनी ऑनलाईन परिक्षेत मिळविलेल्या गुणांच्या १०टक्के अधिक गुण त्यांच्या लेखी परिक्षेतील गुणांमध्ये मिळवून येणा-या गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल. त्यासाठी उमेदवाराने 'वीजतंत्री' या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी पूर्ण केल्याबाबतचे तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनीने जारी केलेले प्रमाणपत्र ऑनलाईन अर्जासोबत इतर कागदपत्रांबरोबर स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे. अन्यथा अतिरिक्त गुणांचा लाभ मिळणार नाही याची नोंद घ्यावी. तदर्थ म.रा.वि.मंडळ / महापारेषण कंपनीत शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केले नसतांना सुध्दा ते म.रा.वि.मंडळात /महापारेषण कंपनीत पुर्ण केले आहे अशी चुकीची माहिती ऑनलाईन अर्जात नमूद करु नये. तसे निदर्शनास आल्यास उमेदवारी रद्द केली जावू शकते.

६. महापारेषण कंपनीसाठी जमीन दिलेल्या कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांना त्यांनी ऑनलाईन परीक्षेत मिळविलेल्या **गुणांमध्ये महापारेषण कंपनीच्या कौशल्य विकास योजने अंतर्गतचे वाढीव गुण त्या योजनेनुसार लागू राहील**. कौशल्य विकास योजने बाबतचे प्रमाणपत्र महापारेषण कंपनीच्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराने संबंधीत परिमंडल कार्यालयातून प्राप्त करावे व त्याची प्रत ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करावी. अधिक गुण त्यांच्या लेखी परिक्षेतील गुणांमध्ये मिळवून येणा-या गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल. त्यासाठी उमेदवाराने संबंधीत जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी जारी झालेले प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अर्ज करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत धारण केलेले असले पाहीजे. सदर प्रमाणपत्र ऑनलाईन अर्जाबरोबरच स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक राहील. अन्यथा अतिरिक्त गुणांचा लाभ मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

७. ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या सादर केलेल्या सर्व उमेदवारांना ऑनलाईन लेखी परिक्षेस बोलविण्यात येईल.

८. लेखी परीक्षेसाठी उमेदवारांना बोलविण्यापूर्वी त्यांच्या पात्रतेची पडताळणी केली जाणार नाही. त्यामुळे लेखी परीक्षेला बोलविले म्हणजे उमेदवार त्या पदासाठी पात्र आहे असे होणार नाही. उमेदवाराची निवड ही त्याच्या पात्रतेसंबंधीच्या स्कॅन करुन अपलोड केलेल्या कागदपत्रांची व अन्य प्रमाणपत्रांची पडताळणी करूनच केली जाईल. त्यामूळे उमेदवाराने परीक्षा दिली म्हणून व लेखी परिक्षेत गुण मिळाले म्हणून निवड करण्यासाठी उमेदवाराचा हक्क राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९. निवडसूची बनविताना ज्या उमेदवारांचे एकत्रित मिळविलेले गुण समान असतील त्यामधील **जो उमेदवार महापारेषण कंपनीसाठी जमीन दिलेला प्रकल्पग्रस्त असेल तर त्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.** तसा उमेदवार नसल्यास तदर्थ म.रा.वि. मंडळाचे / महापारेषण कंपनीकडे वीजतंत्री या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनी किंवा बाह्यस्थ दोन किंवा अधिक उमेदवारांचे एकूण गुण समान असतील तर सदर उमेदवारांची **जन्मतारीख** विचारात घेवून त्यांच्यातील जेष्ठताक्रम (वयाने जेष्ठ असणाऱ्यास प्राधान्य) ठरविण्यात येईल.

## १२) भरती प्रक्रियेचा कार्यक्रम:-

| | | |
|---|---|---|
| १) | अर्जदारांना ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | दिनांक ०९.१२.२०१७ पासून दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत. (रात्री ११.५९ मिनीटांपर्यत) |
| २) | लेखी परीक्षेचा अंदाजित महिना | फेब्रुवारी / मार्च २०१८ |

* लेखी परीक्षेचा महिना अंदाजित असून त्याबाबतचा कंपनीचा निर्णय अंतिम राहील.

## १३) सर्वसाधारण अटी व शर्ती :

१) जाहिरातीत नमुद केलेल्या पदासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने तो प्रकल्पगस्त आहे का ? व त्याने विहित शैक्षणिक अर्हता, वय, प्रमाणपत्रे वगैरे बाबी धारण केलेल्या आहेत याची खात्री करुनच अर्ज करावा.

२) जाहिरातीत दर्शविण्यात आलेली अर्हता ही ‘**किमान**’ अर्हता आहे आणि केवळ ही किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबंधित पदाच्या निवडीसाठी पात्र ठरु शकणार नाही.

३) या जाहिरातीला अनुसरुन पात्र उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने विहित मुदतीत सादर केलेले अर्ज विचारात घेतले जातील. अन्य पध्दतीने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

**४)** **उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.** त्यासाठी शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उमेदवाराने अर्जासोबत **स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे.**

**५) ऑनलाईन परिक्षेनंतर उमेदवारांची पात्रता व निवड ही त्यांनी अपलोड केलेल्या प्रमाणपत्रांवरच निश्चित करण्यात येणार असल्याने संबंधित उमेदवारास लागू असलेली सर्व प्रमाणपत्रे त्याने /तिने अपलोड करावीत. अर्हता निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे अपलोड न करणाऱ्या किंवा त्या ठिकाणी इतर कागदपत्रे अपलोड केल्यास अशा उमेदवारांचा निवडीसूची तयार करतांना विचार केला जाणार नाही / त्यांना अपात्र ठरविण्यात येईल याची उमेदवारानी अर्ज सादर करतानांच गांभिर्याने नोंद घ्यावी. याबाबत कंपनीचा निर्णय अंतिम राहील व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.**

**६) सुस्पष्ट स्कॅन नसलेली कागदपत्रे / स्वाक्षरी अथवा फोटो अपलोड न केलेले / कोणत्याही प्रकारे अपूर्ण असलेला अर्ज भरती प्रक्रिये करीता विचारात घेतला जाणार नाही.**

७) उमेदवाराने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील तरतुदीप्रमाणे एक आवश्यक बाब म्हणून **‘लहान कुटुंब’** असल्याचे प्रतिज्ञापत्र भरुन देणे आवश्यक आहे.

८) उमेदवाराने जर रोजगार व स्वयंरोजगार केंद्र येथे नाव नोंदविले असल्यास त्यांनी ऑनलाईन अर्जात नोंदणी क्रमांक नमूद करावा.

**९) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असल्याबाबत खालील प्रमाणे प्रमाणपत्र ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक राहील:**

माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र अथवा मान्यता प्राप्त विद्यापिठातील / दहावी किंवा त्यावरिल परिक्षा मराठी विषयासह उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र.

**किंवा**

उमेदवारास मराठी भाषा लिहीता व वाचता येत असल्याबद्दलचे मान्यताप्राप्त विद्यापिठ / संस्थाकडील मराठी भाषेच्या प्राध्यापकाच्या स्वाक्षरीचे व त्यावर सदर विद्यापीठ/संस्थेच्या प्राचार्यांची प्रतिस्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र.

१०) निवड झालेल्या उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे अपेक्षीत आहे. परंतू मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या उमेदवारास सेवेत रुजू झाल्याच्या तारखेपासून ३ वर्षांच्या आत मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहिल.

११) उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेकरिता स्वखर्चाने यावे लागेल. याकरीता कोणत्याही प्रकारच्या प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येणार नाही.

१२) सदर पदाच्या निवड प्रक्रियेत ऑनलाईन परिक्षा कालावधीत, परीक्षेस विलंब होणे, परीक्षा पुर्णपणे रद्द होणे अथवा निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात अडचणी येणे याबाबतची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत परीक्षा वेळेवर पार पाडण्याचे/परिक्षा पुन्हा सुरु करण्याचे /निवड प्रक्रिया पुर्ण करण्याचे शक्यते सर्व प्रयत्न कंपनीतर्फे करण्यात येतील. तथापि आवश्यकता भासल्यास पुन्हा परीक्षा देखील घेतली जावू शकते. याबाबत कंपनीचा निर्णय अंतिम राहील. कंपनीचा निर्णय मान्य नसणाऱ्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१३) निवड झालेल्या उमेदवारांना रिक्त पदे व अनुशेषाचा विचार करुन या परिमंडलाच्या कार्यक्षेत्रामधील कोणत्याही विभागीय कार्यालयाकडे नियुक्तीसाठी वर्ग करण्यात येईल. उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने जाऊन रुजू होणे आवश्यक राहील.

१४) विहित वयोमर्यादेतील व पात्र अशा शासकीय / निमशासकीय सेवेतील / शासकीय उपक्रमातील कर्मचा-यांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या संस्थेच्या / कंपनीच्या सेवेमधून कार्यमुक्त केल्याचे प्रमाणपत्र रुजू होतेवेळी आवश्यक राहील. मात्र त्यांच्या पूर्वीच्या संस्थेच्या /कंपनीच्या सेवेची कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही.

१५) उमेदवाराने जाणीवपूर्वक अथवा हेतूपुरस्सर चूकीची / खोटी माहिती अथवा कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर केल्यास अथवा माहिती दडविली आहे असे आढळल्यास उमेदवारास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा त्यांचे पूर्वचारित्र्यात गैर असल्याचे आढळून आल्यास अपात्र ठरविण्यात येईल आणि नियुक्ती दिली असल्यास कोणत्याही नोटीसीशिवाय किंवा कोणतेही कारण न देता बडतर्फ करण्यातचा अधिकार कंपनीस राहील.

१६) महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्याने भरती प्रक्रियेसाठी जाणीवपूर्वक अथवा हेतूपुरस्सर चूकीची / खोटी माहिती अथवा कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर केली असल्यास अथवा माहिती दडविली आहे असे आढळल्यास अशा कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच अशा उमेदवाराची नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

१७) भरती प्रक्रियेत उमेदवाराने प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप करण्याचा अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१८) निवड समितीने तयार केलेल्या निवड सूचीची विधी ग्राह्यता (Validity) निवडीच्या तारखेपासून एक वर्षापर्यंत राहील. त्यानंतर ही निवड सूची कंपनीच्या नियमाप्रमाणे व्यपगत होईल.

१९) जाहिरातीत किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतः किंवा संपूर्ण बदल करण्याचे तसेच, जाहिरात अंशतः किंवा पुर्णपणे रद्द करण्याचे अधिकार कंपनी राखुन ठेवित आहे. याबाबतचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविणे कंपनीस बंधनकारक नसेल.

२०) जाहिरातीतील पदांची भरती प्रक्रियेबाबतचा कंपनीचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.

२१) भरती प्रक्रिये संबंधीची माहिती वेळोवेळी कंपनीच्या www.mahatransco.in या संकेतस्थळावरील “Career” Page वर प्रसिध्द करण्यात येईल. संबंधीत उमेदवारांनी भरती प्रक्रियेसंबंधीच्या अद्ययावत माहितीसाठी कंपनीचे संकेतस्थळ वेळोवेळी पहावे.

२२) या जाहिरातीच्या अनुषंगाने निर्माण झालेला कोणताही विवाद हा **मा. सातारा न्यायालयाच्या** कार्यक्षेत्रात असेल.

दिनांकः- ०४.१२.२०१७

मुख्य अभियंता
अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल कराड

**ऑनलाइन अर्ज सादर करण्याकरिता येथे Click करा**

(वरील ऑनलाईन अर्ज सादर करण्याची लिंक दि. ०९.१२.२०१७ पासून उपलब्ध होईल)

## Annexure

## Guidelines for Scanning and Upload of Photograph, Signature and required documents / certificates.

Before applying online, a candidate will be required to have a scanned (digital) image of his/her photograph and signature as per the specifications given below.

(1) **Photograph Image:**

- Photograph must be a recent passport style colour picture.
- Make sure that the picture is in colour, taken against a light-coloured, preferably white, background.
- Look straight at the camera with a relaxed face
- If the picture is taken on a sunny day, have the sun behind you, or place yourself in the shade, so that you are not squinting and there are no harsh shadows
- If you have to use flash, ensure there's no "red-eye"
- If you wear glasses, make sure that there are no reflections and your eyes can be clearly seen.
- Caps, hats and dark glasses are not acceptable. Religious headwear is allowed but it must not cover your face.
- Dimensions 200 x 230 pixels (preferred)
- Size of file should be between 20kb–50 kb
- Ensure that the size of the scanned image is not more than 50kb. If the size of the file is more than 50 kb, then adjust the settings of the scanner such as the DPI resolution, no. of colours etc., during the process of scanning.

(2) **Signature Image:**

- The applicant has to sign on white paper with Black Ink pen.
- The signature must be signed only by the applicant and not by any other person.
- The signature will be used to put on the Call Letter and wherever necessary.
- If the Applicant’s signature on the answer script, at the time of the examination, does not match the signature on the Call Letter, the applicant will be disqualified.
- Dimensions 140 x 60 pixels (preferred)
- Size of file should be between 10kb – 20kb
- Ensure that the size of the scanned image is not more than 20kb

(3) **Scanning the photograph, signature and documents / certificates:**

- Set the scanner resolution to a minimum of 200 dpi (dots per inch)
- Set Color to True Color
- File Size as specified above
- Crop the image in the scanner to the edge of the photograph/signature/Document/ Certificate, then use the upload editor to crop the image to the final size (as specified above).
- The image file should be JPG or JPEG format. An example file name is : image01.jpg or image01.jpeg Image dimensions can be checked by listing the folder files or moving the mouse over the file image icon.
- Candidates using MS Windows/MSOffice can easily obtain photo, signature and each document in .jpeg format not exceeding 50kb, 20kb and 500 kb respectively by using MS Paint or MSOffice Picture Manager. Scanned photograph, signature and each document in any format can be saved in .jpg format by using Save As option in the File menu and size can be reduced below 50 kb (photograph), 20 kb(signature) and 500 kb (for each document) by using crop and then resize option (Please see the preceding paragraphs in this Annexure above for the pixel size) in the Image menu. Similar options are available in other photo editor also.
- If the file size and format are not as prescribed, an error message will be displayed.
- While filling in the Online Application Form the candidate will be provided with a link to upload his/her photograph, signature, respective documents/certificates.

(4) **Procedure for Uploading the Photograph, Signature and documents / certificates-**

- There will be separate links for uploading Photograph, Signature, documents / certificates.
- Click on the respective link “Upload Photograph / Signature / Documents / Certificates viz: Date of Birth, Qualification, Caste Certificate, Caste Validity Certificate (If available) Non Creamy Layer, Apprenticeship Certificate, Project Affected Certificate etc”

- Browse and Select the location where the Scanned Photograph, Signature and documents / certificates file has been saved.
- Select the file by clicking on it.
- Click the “Open/Upload” button.

**Your Online Application will not be accepted /get submitted unless you upload your photograph, signature and documents / certificates as specified.**

**Note:**

(1) In case the face in the photograph or signature or any document is unclear the candidates application may be rejected.

(2) Before uploading the photograph, signature, documents / certificates in the online application form, candidates should check that the images are clear and readable.

(3) After submission online candidates are advised to take a printout of their system generated online application forms.

## Instructions

1) Once document, Photograph & signature uploaded cannot be modified. Check again before uploading.
2) Kindly enter correct/Valid mobile no. & email id, further information will be provided on this details only.
3) No modification will be done once after submission of the each application page.
4) Internet connection should be good & stable while uploading documents.
5) Kindly clear system cookies & cache before filling application

*****

# SCRIBE DECLARATION FORM

We, the undersigned, Shri/Smt/Kum. ______________________________eligible candidate for the On-line examination for recruitment of the post _____________________ to be held on ________________ and Shri/Smt/Kum. _________________________ eligible writer (scribe) for the eligible candidate, do hereby declare that :

i. The scribe is identified by the candidate at own cost and as per own choice.

ii. Qualification of the candidate and the scribe are as under:

| Qualification (whether Graduate, Post graduate etc.) | |
|---|---|
| Candidate | Scribe |
| | |

iii. The candidate is visually impaired or affected by cerebral palsy with locomotor impairment, his/her writing speed is adversely affected permanently and he/she needs a writer (scribe) as permissible under the Government of India rules governing the recruitment of Persons with Disability.

2. As per the rules, Only Visually Impaired (blind / low vision) candidates shall be allowed compensatory time of 20 minutes for every hour of the examination whether availing the facility of scribe or not. Other candidates i.e. Orthopedically Handicap (whose writing speed is adversely affected permanently by cerebral palsy with loco-motor impairment) shall be allowed compensatory time of 20 minutes for every hour of the examination availing the facility of scribe.

3. In view of the importance of the time element, the examination being of a competitive nature, the candidate undertakes to fully satisfy, if necessary, the Medical Officer of the MSETCL that there was necessity for use of a scribe as his/her writing speed is affected by the disabilities mentioned in Paragraph 1, clause (iii) above.

4. We hereby declare that all the above statements made by us are true and correct to the best of our knowledge and belief. We also understand that in case it is detected at any stage of recruitment that we do not fulfill the eligibility norms and/or that the information furnished by us is incorrect/false or that we have suppressed any material fact(s), the candidature of the applicant will stand cancelled, irrespective of the result of the written test(s). If any of these shortcomings is/are detected even after the candidate's appointment, his/her services are liable to be terminated.

**Given under our signature:-**

Signature of the Scribe

Postal address:

STD Code:……… Phone No………….
Mobile No:-………………

Signature of the Candidate
Name of the Post:-_______________
Roll No.:
Postal address:

STD Code:……… Phone No………….
Mobile No:-………………

______________________________
Signature of Invigilator

**PHOTO OF THE SCRIBE**